# घटक- अनुसूचित व आदिवासी क्षेत्र

⇒ घटनेच्या दहाव्या भागातील — कलम २४४

अनुसूचित क्षेत्रे व आदिवासी क्षेत्रे – प्रशासनासाठी काही विशेष पद्धती.

परिशिष्ट ५वे ⇒ अनुसूचित क्षेत्रे व अनुसूचित जमातींच्या प्रशासन व नियंत्रण संबंधित.
(आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम सोडून)

परिशिष्ट ६वे ⇒ आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम या क्षेत्रातील आदिवासी क्षेत्राशी संबंधित

## * अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन *

सामाजिक/ आर्थिक दृष्ट्या काहिसे मागासलेले व त्यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता असलेले आदिवासी राहत असल्याने अनुसूचित क्षेत्राचे प्रशासन इतर क्षेत्रांपेक्षा वेगळ्या प्रकारे चालवले जाते.

### * अनुसूचित क्षेत्र घोषित करणे

अधिकार राष्ट्रपतीला - संबंधित राज्याच्या राज्यपालांशी विचारविनिमय करून ते असे क्षेत्र वाढवू शकतो / कमी करू शकतो / सीमारेषा बदलू शकतो.

अनुसूचित क्षेत्र म्हणून दिलेला दर्जा रद्द करू शकतो किंवा दर्जा देण्यासंबंधी नव्याने आदेश काढू शकतो.

### * राज्य आणि केंद्राचे कार्यकारी अधिकार

राज्याचे कार्यकारी अधिकार अनुसूचित क्षेत्राला लागू - जबाबदारी राज्यपालावर

अशा क्षेत्राच्या प्रशासनाबाबत राज्यांना आदेश देण्याचा केंद्राला अधिकार.

### * आदिवासी सल्लागार परिषद

अनुसूचित क्षेत्र असलेल्या प्रत्येक राज्याने आदिवासी सल्लागार परिषद स्थापन करावी.

सदस्य-20 असतील. त्यापैकी 3/4 म्हणजे 15 सदस्य विधान सभेतील ST-चे प्रतिनिधी.

राष्ट्रपतींनी आदेश दिला तर ST असलेल्या पण अनुसूचित क्षेत्र नसलेल्या राज्यांना सुद्धा अशी परिषद स्थापन करता येते.

### * अनुसूचित क्षेत्राला लागू होणारे कायदे *

संसदेचा किंवा राज्य विधिमंडळाचा कोणताही विशिष्ट कायदा या क्षेत्राला लागू होणार नाही किंवा विशिष्ट बदल करून किंवा अपवाद करून लागू होतो असा आदेश काढण्याचे अधिकार राज्यपालास.

तो आदिवासी सल्लागार परिषदेशी विचार विनिमय करून सुशासनाचे नियम करतो यामध्ये जमीन हस्तांतर प्रतिबंध, या लोकांना भूमी देण्यासंदर्भात नियम, कर्ज देण्याच्या प्रक्रियेच्या नियमांचा समावेश.

Scanned by CamScanner

अनुसूचित क्षेत्राच्या प्रशासनाबाबत राष्ट्रपतींना आयोग नियुक्त करावा लागतो. असा आयोग ते कधीही स्थापन करू शकतात. पण राज्यघटना चालू झाल्यापासून १० वर्षांत लागू करणे अनिवार्य. त्यानुसार सन १९६० - यु. एन. ढेबर अध्यक्षतेखाली पहिला आयोग. अहवाल १९६१ त्यानंतर २००२ दिलीपसिंह भूरिया —— ,, —— दुसरा आयोग अहवाल २००४.

## *आदिवासी क्षेत्रांचे प्रशासन*

राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टात → आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम - या चार राज्यातील आदिवासी क्षेत्राच्या प्रशासनाबाबत विशेष तरतुदी.

प्रशासनाची वैशिष्ट्ये :

→ वरील चार राज्यातील आदिवासी जिल्हे - स्वायत्त जिल्हे बनविण्यात आले आहेत. पण ते राज्याच्या कार्यक्षेत्रा बाहेर नाहीत.

→ या स्वायत्त जिल्ह्यांची आखणी / पुनआखणी करण्याचे अधिकार - राज्यपाल

→ स्वायत्त जिल्ह्यात निरनिराळ्या जमाती असतील तर राज्यपाल त्याचे स्वायत्त भाग पाडू शकतो.

→ स्वायत्त जिल्ह्यात जिल्हा परिषद → सदस्य 30 - 26 सदस्य प्रौढ मतदान पद्धतीने तर 4 राज्यपालांद्वारे

→ स्वायत्त जिल्ह्यांची स्वतंत्र विभागीय परिषद असते.

→ जिल्हा/विभागीय परिषदा - भूमी, वन, कालव्याचे पाणी, स्थलांतरीत शेती, ग्रामप्रशासन, मालमत्तेचा वारसा, विवाह व घटस्फोट इ. विषयावर कायदे करू शकतात. त्यास राज्यपालांची मंजुरी आवश्यक.

→ जिल्हा व विभागीय परिषदा न्यायालये स्थापन करू शकतात.

→ जि. प. जिल्ह्यात प्राथ. शाळा, दवाखाने, बाजारपेठ, मत्स्योद्योग निर्माण करू शकतो.

→ जिल्हा व विभा. परिषदांना शेतसारा व काही कर आकारण्याचे व संकलनाचे अधिकार

→ संसदेचे व राज्य विधिमंडळाचे कायदे या जिल्ह्यांना लागू होत नाही. किंवा काही बदल करून वा अपवाद करून लागू होतात. ते अधिकार आसामच्या बाबतीत राज्यपालांना तर मेघालय, त्रिपुरा व मिझोराम साठी संसदेच्या कायद्यासाठी राष्ट्रपतीला तर राज्याच्या कायद्यासाठी राज्यपालाला.

→ स्वायत्त जिल्ह्याच्या प्रशासनाच्या परिक्षणासाठी राज्यपाल आयोग नेमू शकतो. त्यांच्या शिफारशीवरून जिल्हा किंवा विभा. परिषद विसर्जित करू शकतो.

Scanned by CamScanner

## आदिवासी क्षेत्रे २०१६

१) आसाम - १) उत्तर कचार पर्वतीय जिल्हा.
२) कारबी अंगलोंग जिल्हा
३) बोडोलँड जिल्हा.

२) मेघालय - १) खाँसी, २) जैंतिया, ३) गारो } पर्वतीय जिल्हा.

३) त्रिपुरा -- त्रिपुरा आदिवासी क्षेत्र जिल्हा.

४) मिझोराम - १) चकमा, २) मारा, ३) लाई } जिल्हा.

## अनुसूचित क्षेत्रासंबंधी आदेश २०१६

१) अनुसूचित क्षेत्र (भाग ए) राज्ये १९५० ⟶ आंध्र प्र. व तेलंगणा
२) —॥— (भाग बी) राज्ये १९५० ⟶ —॥—
३) —॥— (हिमाचल प्रदेश) १९७५ ⟶ हिमाचल प्र.
४) —॥— (बिहार, गुज, मध्य.प्र. ओडीशा) १९७७ ⟶ गुजरात व ओडीशा.
५) —॥— (राजस्थान) - १९८१ ⟶ राजस्थान
६) —॥— (महाराष्ट्र) आदेश १९८५ ⟶ महाराष्ट्र
७) —॥— (छत्तीसगड, झारखंड, म. प्रदेश) २००३ ⟶ छत्तीसगड व म. प्रदेश.
८) —॥— (झारखंड) आदेश २००७ ⟶ झारखंड